३५

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-॥, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-२/ ३४६ /२०२२
दिनांक :-२९/०४/२०२२.

"जाहिर नोटीस"
(झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **"उपरोक्त अधिनियम"** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे अद्याप कोणत्याही विकसकाचा प्रस्ताव दाखल झालेला नसल्याचे दिसून येते.

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या ही मिळकत घोषित नसल्याचे दिसून येते. तथापि, सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.झोनिपु/०७/कावि/१२९/२०२१, दि.२६/१०/२०२१ अन्वये सदर ठिकाणी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे सादर केला आहे. तसेच सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा, पुणे यांचेकडून दि.२२/०४/२०२२ रोजी स्थळ पाहणी केली असता झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल देखील सादर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, मोजणीनुसार येणारे क्षेत्र ओपन स्पेस वगळून ४२८३.५७ चौ.मी. व त्रिमिती पध्दतीनुसार येणारे ओपन स्पेसचे क्षेत्र १२१९२.६१ चौ.मी. असून त्रिमिती पध्दतीनुसार येणारे असे एकूण क्षेत्र १६४७६.१८ चौ.मी. इतके क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना **"कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील "** असे नमूद केले आहे.

आणि ज्याअर्थी, या नोटीसाद्वारे सोबत अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचे नियोजन आहे. आणि;

त्याअर्थी, या अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२ यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

## अनुसूची

**महानगरपालिकेचे नाव** :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**झोपडपट्टीचे नाव** :- स.नं.१९२पै.,१९३पै.,१९४पै., फा.प्लॉ.नं.४६ ते ५५, सि.स.नं.१३०पै., १३२पै., १३३पै., १३४पै., १३६पै., १३७पै., सेक्टर नं.२९, रमाबाईनगर झोपडपट्टी, रावेत, पिंपरी चिंचवड, पुणे

| गाव | फा.प्लॉ.क्र /सि. स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र ( चौ. मी.) पूर्णत: | चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मौजे रावेत | स.नं.१९२पै.,१९३पै.,१९४पै., फा.प्लॉ.नं.४६ ते ५५, सि.स.नं.१३०पै., १३२पै., १३३पै., १३४पै., १३६पै., १३७पै., सेक्टर नं.२९, रमाबाईनगर झोपडपट्टी, रावेत | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण | ओपन स्पेस वगळून ४२८३.५७ चौ.मी. व ओपन स्पेसचे क्षेत्र १२१९२.६१ चौ.मी. असे एकूण क्षेत्र **१६४७६.१८ चौ.मी.** | **पुर्वेस** - सि.स.नं.१३४पै.<br>**पश्चिमेस** - लागू रस्ता व सि.स.नं.१३७पै.<br>**दक्षिणेस** - सि.स.नं.१३३ पै., व १३६ पै. व संरक्षक भिंत<br>**उत्तरेस** - सि.स.नं.१३२ पै., १३०पै. व १२९ पै. व लागू रस्ता | |

सदरची नोटीस ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

(राजेंद्र निंबाळकर) भा.प्र.से
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :२९/०४/२०२२

प्रत-

१. आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे (PMRDA) यांना - पुढील कार्यवाहीसाठी.
२. मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीस्तव सादर.
३. मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.